<u>नि दि. दावा क्रमांक ४५३/२०२२</u>

श्रीकृष्ण व इतर वि. सरकार व इतर ४

CNRNO.0200-4192-2022

<u>निशाणी ०५ खालील आदेश</u>

(दिनांक २२.०१.२०२४)

१) प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाई हूकूम मिळण्यासाठी वादीने दाखल केला आहे. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे—

२) वादीने कायम मनाई हुकुमासाठी व आज्ञार्थी हुकुमासाठी तसेच ताबा व घोषित होउन मिळण्यासाठी दाखल केलेल्या दाव्यात मौजे माना, ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथील शीट क्र. ३, प्लॉट क्र. ५०, ग्रामपंचायत माना, मालमत्ता क्र. ८०, क्षेत्रफळ १७३.६ चौरस मीटर ही खुली जागा प्रस्तुत दाव्याचा वाद विषय आहे व येथुन पुढे सदर जागेचा उल्लेख 'दावा मिळकत' असा केला जाईल.

३) खुशाल चेंडुजी कोकणे हे दावा मिळकतीचे मुळ मालक आहेत. वादी खुशाल यांचे कायदेशीर वारस आहेत व सध्या वादी हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. सन १९५२ साली भूमी अभिलेख विभागाने माना गावात चौकशी करून तेथील मालमत्तेच्या मालक व ताबेदारांचे अभिलेख तयार केले. सदर चौकशी दरम्यान मालकी व ताब्याचे कागदपत्र पाहुन १७३.६ चौरस मीटर क्षेत्र खुशाल यांच्या मालकी व ताब्यात आढळुन आले. त्यामुळे सदर क्षेत्रास भूखंड क्र. ५० देण्यात आला व त्या क्षेत्राचे मालक व ताबेदार म्हणुन खुशाल कोकणे यांच्या नावाची नोंद करण्यात आली. त्याचप्रमाणे सदर चौकशी दरम्यान क्षेत्र ३७.३ असलेला भूखंड क्र. ४६ प्रल्हाद चेंडुजी कोकणे, जीवन चेंडुजी कोकणे व यशोदाबाई चेंडुजी कोकणे यांच्या नावे नोंदविण्यात आला. प्रतिवादी क्र. ४ हा प्रल्हादचा मुलगा व प्रतिवादी क्र. ५ हा जीवनचा मुलगा आहे.

४) त्यानंतर प्रल्हाद व जीवन यांनी ११.७ चौरस मीटर क्षेत्र महादेव बबन कोकणे यांना विक्री केले. भूमी अभिलेख विभागाने केलेल्या चौकशीला प्रल्हाद व जीवन यांनी आव्हान केले नाही. त्यानंतर ग्रामपंचायत माना यांनी माना येथील भूखंडांबाबत मालकी दाखविणारे नमुना ८—अ तयार केले व खुशाल चेंडुजी कोकणे यांच्या नावे असलेल्या

मिळकतीला मालमत्ता क्र. ८० देण्यात आला. तसेच प्रल्हाद व जीवन कोकणे यांच्या मिळकतीलाही वेगळा क्रमांक देण्यात आला व सदर मालमत्तेचा कर ग्रामपंचायतीकडे जमा करण्यात आला. त्यानंतर खुशाल यांचा मृत्यु झाल्यावर त्यांचे वारस म्हणुन वादींच्या व त्यांच्या आईच्या म्हणजेच शांताबाई यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या आखीव पत्रिकेला व नमुना ८–अ ला घेण्यात आली. शांताबाई ह्या दि. ०९.१२.२०२१ रोजी मरण पावल्या. मरेपर्यंत शांताबाई दावा मिळकतीत राहत होत्या. वादी क्र. १ व २ कल्याण येथे राहत असुन वादी क्र. ३ ते ५ ह्या विवाहीत असल्यामुळे त्या त्यांच्या सासरी राहत आहेत. असे असले तरी दावा मिळकतीचे वादी मालक व ताबेदार आहेत.

५) सन २०१८–२०१९ मध्ये महाराष्ट्र शासनाने रमाई आवास घरकुल योजना जाहीर केली व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना घरकुल मंजुर करण्यात आले. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी सदर घरकुल लाभार्थ्यांच्या जागेवर मंजुर करायचे असते व प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी लाभार्थ्यांनी ज्या जागेवर घरकुल मंजुर झाले आहे त्या जागेवर घरकुल बांधले आहे का याची शहानिशा करावयाची असते. प्रतिवादी क्र. ४ व ५ प्लॉट क्र. ४६ क्षेत्र ३७.३ चौरस मीटरचे मालक आहेत. परंतु वादींची आई वयोवृद्ध असल्यामुळे व वादी बरेच काळापासुन वेगळ्या ठिकाणी राहत असल्यामुळे त्याचा गैरफायदा घेउन प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दावा मिळकतीवर घरकुलाचे बांधकाम करण्यास सुरवात केली. त्यामुळे वादींच्या आईने प्रतिवादी क्र. २ यांच्या कार्यालयात दि. ०२.०४.२०१९ रोजी नोटीस दिली. त्यामुळे प्रतिवादी यांनी तीन दिवसात मालकी हक्काचे कागदपत्र दाखल करण्याचे तसेच बांधकाम थांबविण्याचे आदेश देण्यात आले.

६) माना पोलीस ठाणेच्या ठाणे अंमलदारांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय मुर्तिजापुर येथे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४५ अन्वये ईस्तेगाशा दाखल केला. सदर प्रकरणात उपअधिक्षक भूमी अभिलेख यांनी खोटा अहवाल देउन प्लॉट क्र. ५० म्हणजेच दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचा ताबा असल्याचे सांगीतले. सदर अहवालावर विसंबुन राहुन उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख अकोला यांच्याकडे अपिल दाखल करण्याबाबत निर्देशीत केले. परंतु आजतागायत मालकी बाबत जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी कोणताही आदेश केलेला नाही.

७) वादींची आई शांताबाई ह्या दावा मिळकतीत बांधलेल्या दोन खोल्यांमध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंत राहत होत्या व त्यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दावा मिळकतीवर बांधकाम करण्यास सुरवात केली. त्यानंतर वादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याकडे तसेच इतर कार्यालयात दि. ०९.०६.२०२२ रोजी अर्ज करून प्रतिवादी क्र. ४ व ५ करीत असलेले बेकायदेशीर बांधकाम थांबविण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना बेकायदेशीरपणे घरकुल बांधण्यासाठी हप्त्याचे धनादेश दिले, परंतु प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दावा मिळकतीवर कोणत्याही हक्क व अधिकाराशिवाय बेकायेशीर बांधकाम करण्यास सुरवात केली. प्रतिवादी क्र. १ यांनाही प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या बेकायदेशीर कृत्याची माहिती आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी स्लॅब पर्यंत बांधकाम पुर्ण केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दावा मिळकतीवर दक्षिण बाजुने अतिक्रमण करून ४८० चौ. फु. जागेत दोन खोल्यांचे बांधकाम केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण घडले आहे. प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना घ रकुलासाठी हप्याचे धनादेश देउ नये व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी पुढील बांधकाम थांबवावे असा तात्पुरता मनाई हुकुम देण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

८) प्रतिवादी क्र. ३ यांनी नि. २७ नुसार त्यांचा जबाब दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांचा दाव्यात नमुद तथ्याबाबत काहीही संबंध नाही. प्रतिवादी क्र. ३ सरकारी यंत्रणा असुन शासनाच्या आदेशाप्रमाणे काम करतात. प्रतिवादी क्र. ३ यांना शासनाच्या रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत लाभ्यार्थ्यांचे कागदपत्र तपासुन त्याप्रमाणे घरकुलासाठी रक्कम देण्याचा अधिकार आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्याकडे असलेल्या कादपत्रांचे अवलोकन करून त्यांना प्रतिवादी क्र. ३ यांनी घरकुल बांधण्यासाठी रकमेचे हप्ते दिले. वादींनी कधीही प्रतिवादी क्र. ३ यांना नोटीस देउन प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे बांधकाम थांबविण्याबाबत सांगीतले नाही. वादी हे आत्मदहन करण्याची नोटीस देउन प्रतिवादी क्र. ३ वर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. विभागीय अधिकारी मुर्तिजापुर यांनी वादींची आई शांताबाई आणि प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख अकोला यांचेकडे अपिल दाखल करण्यास सांगीतले. त्यानंतर माना ग्रामपंचायतीने प्रतिवादी क्र. ३ यांना दिनांक ०६.०४.२०२२ रोजी पत्र देउन त्यांची

प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या बांधकामास हरकत नाही असे सांगीतले. प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना सांगीतले की, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख अकोला यांचेकडील अपिलाचा निर्णय होईपर्यंत ते कोणताही निर्णय घेणार नाहीत व सदर अपिलाच्या निर्णयानंतरच ते घरकुलासाठी रकमेचे हप्ते देण्याचे थांबवतील. प्रतिवादी क्र. ३ यांना त्रास देण्याचे उद्‌देशाने वादींनी त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार केले आहे.

९) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी नि. ३१ ला जबाब दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दाव्यात नमुद नातेसंबंध मान्य केले आहेत. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी त्यांच्यावर केलेले आरोप अमान्य केले आहेत. परंतु रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत त्यांना घरकुल मंजुर झाल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादी यांच्या दावा मिळकतीवर ४८० चौ.फु. चे अतिक्रमण करून बांधकाम केल्याची बाब अमान्य केली आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे असे म्हणने आहे की, वादी स्वच्छ हाताने न्यायालया समोर आलेले नाहीत व त्यांनी वाद मिळकती संबंधी महत्त्वपुर्ण बाबी लपवुन ठेवल्या आहेत. वादींनी स्वत:चे हीत साधण्यासाठी खोट्या व चुकीच्या माहितीच्या आधारे न्यायालयाची दिशाभुल केली आहे त्यामुळे वादी स्वेच्छाधिकार मागण्यास अपात्र आहे. वादी यांनी चौकशी अधिका—यांच्या चौकशीला प्रस्तुत दाव्यात आव्हान दिले आहे. परंतु तसे आव्हान देण्याकरिता उपसंचालक, भूमी अभिलेख, अमरावती यांचेकडे दाद मागण्याची तरतुद आहे. चेंडाजी कोकणे यांची जीवन, खुशाल, प्रल्हाद व अनुसया ही अपत्ये असुन वादी खुशालची मुले, प्रतिवादी क्र. ४ प्रल्हादचा मुलगा व प्रतिवादी क्र. ५ जीवनचा मुलगा आहे. चेंडाजी कोकणे यांच्या मालकीची मौजे माना येथील प्लॉट क्र. ४६ शीट क्र. ३ ही मिळकत असुन ते तेथे राहत होते. त्यांनी त्या प्लॉटची पूर्व—पश्चिम तोंडी वाटणी करून उत्तरेकडील भाग खुशाल यास, मध्य भाग प्रल्हाद यास व दक्षिणेकडील भाग जीवन यास दिला. त्यानंतर तीनही मुले त्यांना मिळालेल्या जागेवर मालकी हक्काने ताबा घेउन राहु लागले. त्यानंतर खुशाल कोकणे यांनी त्यांना मिळालेल्या जागेपैकी पश्चिम भागातील जागा महादेव कोकणे यांना विकली. व महादेव कोकणे यांना विकलेल्या उत्तर बाजुस प्रल्हाद व जीवन यांना तोंडी वाटणीने प्राप्त झालेल्या जागेपैकी २१ बाय ६ फुटाची जागा १९७४ साली महादेव कोकणे यांना विकली. महसुल विभागाच्या दस्तावरून असे दिसुन येते की, खुशाल कोकणे यांनी त्यांना तोंडी वाटपावरून प्राप्त झालेल्या जागेपैकी काही भाग त्यांनी

महादेव कोकणे यांना विकला व महादेव कोकणे यांना विकलेल्या प्लॉट जागेच्या दक्षिणेकडील जागा खुशाल कोकणे यांनी तोंडी खरेदी खताने सोमा बट यांना व नंतर सोमा बट यांनी मोतिराम इंगळे व लक्ष्मण धंदरे यांना विकली. मोतिराम इंगळे यांचा प्लॉट क्र. ४७, लक्ष्मण धंदरे यांचा प्लॉट क्र. ४८ व महादेव कोकणे यांचा प्लॉट क्र. ४९ झाला. खुशाल कोकणे यांचा प्लॉट क्र. ४६ कायम राहिला. प्रल्हाद व जीवण कोकणे यांचा प्लॉट क्र. ५० कायम राहिला.

१०) प्लॉट क्र. ५० चे एकुण क्षेत्रफळ १७३.६ चौ. मीटर आहे व त्याच्या पुर्वेस रस्ता, पश्चिमेस प्लॉट क्र. ५१, उत्तरेस प्लॉट क्र. ४९, ४७ व ४६ असुन दक्षिणेस पोलीस ठाणे आहे. या प्लॉट जागेवर प्रल्हाद, जीवन व यशोदाबाई यांची तोंडी वाटपाने मालकी हक्काने ताबा वहिवाट आहे. सदर जागेवर त्यांनी घराचे बांधकाम केले असुन त्या जागेवर १९८७ पासुन वीज मीटर घेतले आहे.

११) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या वडिलांचा व त्यानंतर प्रतिवादींचा सदर प्लॉट जागेवर ताबा आहे व तसे महसुल विभागातील कागदपत्रांवरून दिसुन येते. या शिवाय उपविभागीय दंडाधिकारी यांचे आदेशाला वादी यांनी आव्हान दिले नाही. वादीच्या आईने पोलीस ठाणे माना येथे तक्रार दिल्यावर पोलीसांनी उपविभागीय दंडाधिकारी मुर्तिजापुर यांच्याकडे कार्यवाही होण्याकरिता ईस्तेगाशा दाखल केला. त्या प्रकरणात उपविभागीय दंडाधिकारी मुर्तिजापुर यांनी आदेशीत केल्यामुळे उपअधिक्षक, भूमीअभिलेख, मुर्तिजापुर यांनी दि. ०५.१२.२०१९ रोजी अहवाल सादर केला व त्यांनतर दि. २९.०१. २०२१ रोजी उपविभागीय दंडाधिकारी, मुर्तिजापुर यांनी आदेश पारीत केला व त्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे प्लॉट क्र. ४६ व ५० यांच्या प्रत्यक्ष ताबा वहिवाटीमध्ये बदल झाल्याचे दिसुन येते असा निष्कर्ष काढुन जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांचेकडे अपिल करण्याबाबत सुचविले.

१२) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या वडिलांचा प्लॉट क्र ५० क्षेत्र १७३.६ चौ. मी. या जागेवर गेल्या ६० ते ६५ वर्षापासुन अखंड ताबा वहिवाट मालकी हक्काने आहे व त्यानंतर प्रतिवादींचा आहे. उपविभागीय दंडाधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे प्रतिवादी

क्र. ४ व ५ यांनी अभिलेखात झालेली चुक दुरूस्त करून मिळावी म्हणुन जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे एसआर ८०६/अकोला/२०२२ असा अपिल अर्ज केला. त्यावर जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी ताबा व वहिवाटीप्रमाणे मोजणी करण्याचे आदेशीत करून प्रकरण तात्पुरते स्थगित ठेवले आहे. त्यांनतर दि. १७.११.२०२२ रोजी प्र.वा. क्र. ४ व ५ यांनी केलेल्या अर्जाप्रमाणे मोजणी करण्यात आली व ती मोजणी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांच्या कार्यालयात दाखल केल्यावर जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी ता. मुर्तिजापुर मौजे माना येथील शीट क्र. ५, नझुल प्लॉट क. ४६ वरील दि. ०९.१०.१९७० रोजीची व प्लॉट क्र. ५० बाबत दि. ३०. ०८.१९७० रोजीची तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या चौकशीचा निर्णय सदोष असल्याने रद्द केला व उपअधिक्षक, भूमी अभिलेख, मुर्तिजापुर यांना प्लॉट क्र. ४६ व ५० बाबत नव्याने फेरचौकशी करण्याबाबत आदेशीत केले व आजतागायत सदर चौकशी प्रलंबित आहे. वादी यांनी आजपर्यंत उपविभागीय दंडाधिकारी, मुर्तिजापुर यांच्या आदेशाला आव्हान दिलेले नाही. वादीचा दावा मोघम स्वरूपाचा आहे तसेच प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी घरकुलाचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. वादीने मा. जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख अकोला यांच्या आदेशाला आव्हान दिलेले नाही. तसेच वादीला मुळ मालकाविरूद्ध तात्पुरता मनाई हुकुम मागता येणार नाही. भूमी अभिलेख विभागाकडुन चौकशी दरम्यान झालेल्या चुकीचा गैरफायदा घेण्याच्या हेतुने वादी प्रतिवादींच्या जागेवर ताबा व मालकी हक्क दाखवित आहे. प्लॉट क्रमांकामध्ये झालेली चुक लक्षात आल्यावर वादी हे प्रतिवादींची जागा हडपण्याचे प्रयत्नात आहेत त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१३) वादी व प्रतिवादी क्रमांक ४ व ५ तर्फे त्यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या न्यायनिवाड्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहेः—

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	वादी सकृतदर्शनी त्यांची केस सिध्द करतात काय?	**नाही.**
२.	व्यवहार्य सोयीचे पारडे वादींच्या बाजूने झुकते आहे काय?	**नाही.**

३.	वादी असे सिध्द करतात काय की, तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई हुकूमाचा अनुतोष न मिळाल्यास त्यांचे अपरिमित असे पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होणार आहे?	**नाही.**
४.	आदेश काय?	**अर्ज नामंजुर करण्यात येतो.**

कारणमीमांसा

मुद्दा क्र. १ ते ३ बाबत

१४) तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी वादीने सकृतदर्शनी त्याला चांगली केस आहे, मनाई हुकुम न दिल्यास त्याचे नुकसान होणार आहे व सोयीचा समतोलही वादीच्या लाभात आहे ह्या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

१५) वादीच्या दाव्यातील कथनाप्रमाणे वादींचे वडील खुशाल हे दावा मिळकत प्लॉट क्र. ५० चे मालक व कब्जेदार होते व त्यांच्यानंतर वादी दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार झाले. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचा प्लॉट क्र. ४६ असतांनाही त्यांनी वादींच्या दावा मिळकतीत अतिक्रमण करून घरकुल बांधण्यास सुरवात केली आहे. प्रस्तुत प्रकरणात हे मान्य तथ्य आहे की, प्रतिवादी क्र ४ व ५ यांना त्यांच्या जागेवर घरकुल बांधण्यास शासनाने परवानगी दिलेली असुन त्याकरिता घरकुलाचे हप्तेही शासनाकडुन देण्यात आलेले आहेत. वादीने प्लॉट क्र. ५० मध्ये त्यांची मालकी हक्काने कब्जेवहिवाट असल्याबाबत आखीव पत्रिका व नमुना ८ दाखल केला आहे. वादीने दाखल कागपत्रांवरून असे दिसुन येते की वादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या विरूद्ध विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे पत्र देउन असे कळविले होते की, प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादीच्या आईच्या अशिक्षितपणाचा फायदा घेउन तिची फसवणुक करून खोटे कागदपत्र तयार केले व त्या आधारे वादींच्या जागेवर शासकीय योजनेचा फायदा घेउन बांधकाम सुरू केले. वादींच्या आईनेही प्रतिवादी क्र. ४ व ५ हे वादींच्या मालकीचे जागेवर घरकुलाचे बांधकाम करीत असल्याबाबत दि ०२.०४.२०१९ रोजी ग्राम पंचायत माना यांचेकडे तक्रार अर्ज दिला होता. तसेच वादी क्र. १ यांनी प्र.वा.क्र. ४ व ५ यांच्या विरूद्ध ते वादींचे घर

व जागा हडप करतील असा आरोप करणारा तक्रार अर्ज गटविकास अधिकारी, मुर्तिजापुर यांनाही दिला होता. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या आईने तक्रार केल्यावर माना पोलीस ठाणे येथील ठाणे अंमलदार यांनी उपविभागीय अधिकारी, मुर्तिजापुर यांचेकडे सीआरपीसी कलम १४५ अन्वये कारवाई होण्याबाबत कळविले. प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसुन येते की, पोलीसांनी सदर बाब कळविल्यावर उपविभागीय अधिकारी मुर्तिजापुर यांनी उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांना प्लॉट क्र. ५० व ४६ ची मोजणी करून अहवाल देण्याबाबत कळविले. सदर प्रकरणात मोजणी होउन उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांनी दि. २७.१२.२०२२ रोजी अहवाल दिला की, प्लॉट क्र. ५० वर प्र. वा.क्र. ४ व ५ ची ताबा वहिवाट आहे परंतु प्लॉट क्र. ५० च्या आखीव पत्रिकेला धारक म्हणुन वादींची आई शांताबाई आहे. तसेच प्लॉट क्र. ४६ वर शांताबाईची ताबा वहिवाट आहे परंतु प्लॉट क्र. ४६ वर धारक म्हणुन प्रतिवादी क्र. ४ व ५, यशोदाबाई व महादेव कोकणे यांची नावे आहेत. सदर अहवालाला वादीने आव्हानीत केलेले नाही. सदर प्लॉट क्र. ५० व ४६ बाबत झालेली चुक दुरूस्त करून मिळावी म्हणुन व सदर चुकीचे प्लॉट क्रमांकाबाबत झालेला तत्कालीन निर्णय रद्द करून मिळावा म्हणुन प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अकोला प्रतिवादींविरूद्ध अपिल क्र. न.भू. /एस.आर.८६१/मुर्तिजापुर/२०२३ दाखल केले. सदर अपिलात दि. २४.०४.२०२३ रोजी निर्णय होउन अपिल मान्य करण्यात आले व त्यात खालीलप्रमोण आदेश करण्यात आला :—

आदेश

१. अपिलार्थी यांचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. मौजे माना, मा. मुर्तिजापुर, जि. अकोला येथील शिट नं. ५ प्लॉट नं. ४६ या मिळकतीबाबत दिनांक ०९.१०.१९७० रोजीचे व प्लॉट नं. ५० बाबत दि. ३०.०८.१९७० रोजीचे तत्कालिन चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे दिलेले निर्णय सदोष असलेने रद्द करणेत येते आहेत.

३. मौजे—माना, ता. मुर्जिजापुर, जि. अकोला येथील शिट नं. ५ प्लॉट नं. ४६ व ५० बाबत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २० (२) अन्वये पुन्हा नव्याने फेरचौकशी करून योग्य त्या अभिलेखाचे आधारे निर्णय घेणेकामी उप अधीक्षक भूमी अभिलेख, मुर्तिजापुर यांना आदेशीत करण्यात येत आहे.

४. सदर आदेश हे सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या दाव्याच्या अधिन राहुन देणेत येत आहे.

५. उक्त प्रमाणे दिलेला निर्णय, प्रकरणातील पक्षकारास मान्य नसल्यास आदेशाची सुचना प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसांचे आत द्वितीय अपिल मा. उपसंचालक भूमी अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती यांचेकडे दाखल करता येईल.

६. सदर आदेश हे डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून e-qjcourts या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

७. खर्चाबाबत आदेश नाही.

८. निर्णयाची समज सर्व संबंधितांना देण्यात यावी.

स्वा/—
(विलास शिरोळकर)
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख
अकोला.

स्थळ — अकोला.
दि. २४.०४.२०२३.

१६) सदर प्रकरणात वादी हे गैरअपिलार्थी असुन ते सुनावणीस हजर झाले परंतु त्यांनी कोणताही युक्तीवाद केला नाही. सदर आदेशाविरूद्ध वादींनी कोणतेही अपिल दाखल केलेले नाही. सदर आदेशाविरूद्ध वादीला द्वितीय अपिल उपसंचालक, भूमी अभिलेख, अमरावती यांचेकडे करण्याची कायदेशीर तरतुद असतानाही वादीने सदर अपिलातील आदेशाविरूद्ध आव्हान दिलेले नाही. सदर अपिलामध्ये असे अनुमान काढण्यात आले की, प्लॉट क्र. ५० व ४६ या मिळकतीस तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी प्लॉट क्रमांक नोंदविले त्यामुळे सदर चौकशी सदोष असल्यामुळे रद्द करण्यात येत आहे व पुन्हा नव्याने चौकशीचे आदेश देण्यात येत आहेत.

१७) वरील सर्व बाबी वादीने न्यायालयासमोर मांडलेल्या नाहीत त्यामुळे वादीने सत्यपरिस्थिती न्यायालयापासुन लपवुन ठेवलेली आहे असे प्रथमदर्शनी दिसते. वरील सर्व विवेचन विचारात घेता प्रतिवादी क्र. ४ व ५ हे वादींच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण करून बांधकाम करीत आहेत असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. याशिवाय, प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे घरकुलाचे बांधकामही पुर्ण झाले आहे व त्यांना प्रतिवादी क्र. ३ कडुन घरकुलाचा हप्ता घेण्याची आवश्यकता नाही असे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी नि. ३७ वर

प्रतिज्ञालेख दाखल करून कळविले आहे. त्यामुळे वादींचा अर्ज या अर्थानेही टिकणारा नाही. सबब वादीने सकृतदर्शनी त्यांची केस सिद्ध केलेली नाही असे म्हणने योग्य होईल. तसेच दावा मिळकतीत प्रतिवादींचा प्रथमदर्शनी कायदेशिर कब्जा दिसून येतो. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी वादीने सकृतदर्शनी त्याला चांगली केस आहे, मनाई हुकुम न दिल्यास त्याचे नुकसान होणार आहे व सोयीचा समतोलही वादीच्या लाभात आहे ह्या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे. परंतु वादीने या तिनही गोष्टी सिध्द केलेल्या नाहीत त्यामुळे वादी तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र. ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश करीत आहे:—

आ दे श

अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

स्वा/—

(एस.एस.जांभळे)
७ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर),
अकोला.

अकोला
दिनांक: २२/०१/२०२४.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

Name of the Steno	:	R. K. Bore
Court Name	:	C.J.M. Court, Akola.
Date of	:	22.01.2024.
Signed by presiding Officer on	:	22.01.2024.
Uploaded on	:	24.01.2024.